# Pimpri Chinchwad Police Commissionerate

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/४९२८/२०२०

**प्रेसनोट** दिनांक - ३०/१२/२०२०

हिजवडी वाहतुक विभाग हद्दीतील डांगे चौक येथे रोटरी /दुमजली उड्डाणपुल बांधणे या कामांतर्गत डांगे चौक येथे ग्रेड सेपरेटर बांधणेचे काम चालु आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ,भा.पो.से. पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>हिंजवडी वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

१.बिर्ला हॉस्पीटल जवळील छत्रपती संभाजी महाराज चौकातुन डांगे चौकाकडे जाणा-या जड/अवजड वाहनांस सकाळी ०७.०० ते २३.०० वा पर्यंत मनाई करणेत येत आहे

**पर्यायी मार्ग** :- बिर्ला हॉस्पीटल मार्गे मुंबईकडे जाणारी जड वाहने ही रिव्हर व्हयु चौक चिंचवड येथुन वाल्हेकरवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील व पुणे/ वाकड कडे जाणारी जड वाहने छत्रपती संभाजी महाराज चौकातुन थेरगाव-काळेवाडी फाटा या पर्यायी मार्गाने इच्छित स्थळी जातील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे हिंजवडी वाहतुक विभाग हद्दीत चिंचवड कडुन डांगे चौक मार्गे जाणाऱ्या जड /अवजड वाहनांना दि.३१/१२/२०२० पासुन ०२ महिने कालावधीकरीता सकाळी ०७.०० ते २३.०० वा पावेतो प्रवेश बंदी करणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी हिंजवडी वाहतुक विभाग
४) कार्यकारी अधिकारी, बीआरटीएस विभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

# TRAFFIC DIVERSION ROUTE PLAN FOR HEAVY VEHICLES

